सरकारतर्फे साक्षीदार क्र.८ चा सरतपासः-

मी याद्वारे शपथेवर साक्ष देतो की,

माझे नावः - सहा.फौ. एस.एस.कारेगावकर,

वय - ५५ वर्षे, व्यवसाय- नोकरी,

नेमणुक - शनिशिंगणापुर पो.स्टे. ता. नेवासा, जि. अहमदनगर.

अभियोग पक्षातर्फे साक्षीदाराचा सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती एस.पी.औताडे यांचे मार्फत सुरुः-

१. दिनांक २०.०२.२०२२ रोजी मी शनिशिंगणापुर पोलिस स्टेशनमध्ये पोलीस हेड कॉन्स्टेबल या पदावर काम करत होतो. सदर दिवशी मला ठाणे अंमलदार म्हणुन डयुटी होती. त्यादिवशी दादासाहेब कडुभाऊ सोनवणे हे फिर्याद देण्यासाठी आले होते. त्यावेळी फिर्यादीच्या सांगण्याप्रमाणे मी फिर्याद नोंदवुन घेतली. आता मला निशाणी २५ वरील फिर्याद दाखविण्यात आली. ती तीच आहे. त्यावर माझी व फिर्यादीची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे.

२. त्यानंतर मी दैनिक अहवाल व फिर्यादीची प्रत सी.सी.टी.एन.एस ला भरून मुळ कागदपत्रासह जोडली. वरिष्ठांच्या आदेशाने मी बीट अंमलदार असल्याने सदर गुन्हयाचा तपास माझ्याकडे घेतला. आता मला तपास आदेश दाखविण्यात आला. त्यावर माझी सही असुन त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास निशाणी ५० देण्यात येते.

३. त्यानंतर मी घटनास्थळावर जावून दोन पंचांच्या समक्ष घटनास्थळ कम जप्ती पंचनामा केला होता. घटनास्थळ कांगोणी सोनई जाणा-या रोडवर हिंगोणी शिवारात सोनवणे वस्तीवर होते. आता मला सदरील पंचनामा दाखविण्यात आला. तो तोच आहे. त्यावर माझी सही व दोन पंचांच्या सहया आहेत. त्यामधील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास निशाणी ५१ देण्यात येते.

४. मी साक्षीदारांचे जबाब नोंदवले व कागदपत्रात सामील केले. गुन्हयात वापरलेला गज हस्तगत केला व त्याप्रमाणे मुद्देमाल पावती तयार केली. आता मला सदरील पावती दाखविण्यात आली. ती तीच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यामधील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास निशाणी ५२ देण्यात येते.

५. जखमीचे वैद्यकीय प्रमाणपत्र मिळणेसाठी ग्रामिण रूग्णालय नेवासा फाटा यांना दोन वेळा पत्र व्यवहार केला. आता मला सदरची दोन्ही पत्रे दाखविण्यात आली. ती तीच आहेत. त्यावर माझी सही आहे. त्यामधील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास निशाणी ५३ व ५४ अनुक्रमे देण्यात येते. जखमीचे वैद्यकीय प्रमाणपत्र हस्तगत करून मुळ कागदपत्रात सामील केले.

६. आरोपींना न्यायालयात हजर राहण्यासाठी समजपत्र दिले. आता मला सदर समजपत्र दाखविण्यात आले. ते तेच आहे. त्यावर माझी सही व आरोपींची सही आहे. त्यामधील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास निशाणी ५५ देण्यात येते.

७. जप्त मुद्देमाल गज मला दाखविल्यास मी ओळखु शकतो. आता मला अर्टिकल अ वरील गज दाखविण्यात आला. तो तोच आहे. आरोपीविरुध्द सबळ पुरावा मिळुन आल्याने त्याच्याविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले. आरोपी आजरोजी न्यायालयामध्ये हजर आहेत.

सरतपास पुर्ण.

उलटतपास आरोपी तर्फे विधीज्ञ श्री.पी.डी.गर्जे यांच्यामार्फेत शपथेवर सुरु-

८. हे म्हणणे खरे आहे की, हिंगोणी गावातील लोक माझ्या ओळखीचे आहेत. फिर्याद २० तारखेला दाखल झाली आहे. हे म्हणणे खरे आहे की, पंचनाम्यावरील परिच्छेद क्र.८ मधील मुद्देमाल वर्णनामध्ये गज जप्त आहे असे नमुद नाही. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळाच्या आसपास ब-याच वस्त्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी आसपासच्या लोकांचे जबाब नोंदविलेले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, पंचाच्या सहया पोलीस स्टेशनला घेतल्या. हे म्हणणे खरे आहे की, साक्षीदार व पंचांचे जबाब फिर्यादीच्या सांगण्याप्रमाणे नोंदविलेले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, पंचांना पंचनाम्यासाठी नोटीस दिली नाही. हे म्हणणे खरे आहे की, स्वतंत्र गजाचा मी पंचनामा केला नाही. हे म्हणणे खरे आहे की, वरिष्ठांनी मला लेखी आदेश दिलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, जप्ती पंचनाम्यावर आरोपींच्या सहया नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, गज हा आरोपीच्या ताब्यातुन जप्त झालेला नाही. हे म्हणणे ख्रे आहे की, गज फिर्यादीने दिला. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी व आरोपी क्र.१ हे भाऊ – भाऊ आहेत. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी व आरोपीमध्ये वाटपावरून दिवाणी वाद आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटा तपास करून, खोटे दोषारोपपत्र दाखल केले. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी कोणताही गुन्हा केला नाही व कोणतीही घटना घडली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात सांगितलेला संपुर्ण मजकूर खोटा आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकती,

ASHATAI NARAYAN SARAK Digitally signed by ASHATAI NARAYAN SARAK Date: 2026.02.14 15:10:41 +0530

(श्रीमती.ए.एन.सरक)

दिनांक- १४/०२/२०२६. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.३,

नेवासा